# सरसंगण २०२० क्रिकेट स्पर्धेच्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन

**फातोर्डा**, ता. २१ (प्रतिनिधी) : सरसंगण २०२० क्रिकेट स्पर्धेच्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन फातोर्डाचे आमदार विजय सरदेसाई यांच्या हस्ते व गोवा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष सुरज लोटलीकर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या प्रसंगी आयोजन समितीतर्फे डॉ. सत्येश कामत, संतोष कामत, मयुर कामत, सागर कामत, गुरुदत्त पै आंगले, सगुण उर्फ दादा नायक, आरव आणि हरेश काकोडकर हे प्रतिनिधी उपस्थित होते.

सारस्वत स्पोर्टस् संघ आयोजित या स्पर्धेत गेल्यावर्षी १८ संघांनी भाग घेतला होता. यंदा ही स्पर्धा १ फेब्रुवारी ते १९ एप्रिल २०२० या कालावधित आयोजित करण्यात आली आहे. गोव्यातील ४४ संघ चार गटांमध्ये खेळल्या जाणाऱ्या या स्पर्धेत भाग घेतील. ही स्पर्धा १९ वर्षाखालील, वेटरन्स ४५ वर्षावरील, लेदर बॉल क्रिकेट व टेनिस बॉल क्रिकेट अशा गटांमध्ये खेळवली जाईल. स्पर्धेचे सामने मडगाव एमसीसी मैदानावर खेळविले जातील. गौड सारस्वत समाजातील उत्कृष्ट खेळाडूंना सर्वोत्तम साधनसुविधा तसेच या समाजातील आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदत करण्यास सारस्वत स्पोर्टस् संघ ही धर्मादाय संस्था कार्य करते, असे निमंत्रक सोनल गोमाकांत म्हांब्रे यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटले आहे.



**मडगाव : सरसंगण २०२० क्रिकेट स्पर्धेच्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करताना फातोर्डाचे आमदार विजय सरदेसाई, जीसीए अध्यक्ष सुरज लोटलीकर व आयोजन संस्थेचे प्रतिनिधी.**

Scanned by CamScanner